Phone: 011-22520242 (Technical Query)
Phone: 011- 22528257 (General Queries Reg. Affl.)
Fax: 011-22540655

E-Mail: cbse.aff@nic.in
Website: www.cbse.nic.in
Affiliation Website: www.cbseaff.nic.in

CENTRAL BOARD OF SECONDARY EDUCATION
(An Autonomous Organization under the Union Ministry of Human Resource Development Govt. of India)
"SHIKSHA KENDRA", 2, COMMUNITY CENTRE, PREET VIHAR, DELHI – 110 301

REGD./SPEED POST
Circular No. 10

No. CBSE/AFF./Circular/2013/10/581277 Dated: 08.07.2013

To,

All the Principals of the schools affiliated to the CBSE

**Sub:- Amendment in affiliation Bye-laws Rule 3.3(I) chapter II-reg.**

Sir/Madam,

Consequent upon recommendations of the Affiliation Committee made in its meeting held on 24.06.2013 and subsequently approval of the Governing Body of the Board in its meeting held on 28.06.2013, the following amendment in affiliation Bye-laws of the Board has been made by the Board:

| Existing Rule 3.3 (I) chapter II | Amended Rule 3.3 (I) chapter II |
|---|---|
| The school seeking provisional affiliation with the Board must have formal prior recognition of the State/U.T. Govt. Its application either should be forwarded by the State Govt. or there should be a No Objection Certificate to the effect that State Government has no objection to the affiliation of the school with the CBSE. "No Objection Certificate" once issued to any school will be considered at par even if it s prescribes a specific period of *stage unless it is withdrawn. Condition of submitting a No Objection Certificate will not be applicable to categories 3.1(i) to (iv) | The school seeking provisional affiliation with the Board must have formal prior recognition of the State/U.T Govt. and also to produce evidence to this effect that the applicant school had intimated to the concerned Education Department of the State about the application made to CBSE for seeking affiliation with the Board. In case, the Board receives any objection during the process of application of the school, the Board may ask the concerned school to produce the No Objection Certificate from the State Government or otherwise it would be assumed that concerned State/U.T. Government has No objection. |

The above amendment is brought to the notice of all concerned.

Yours faithfully,

(U C BODH)
DEPUTY SECRETARY (AFF.)
09/07/13

Copy for information to the following:

1. The Commissioner, Kendriya Vidyalaya Sangathan, 18- Institutional Area, Shaheed Jeet Singh Marg, New-Delhi-110016.
2. The Commissioner, Navodaya Vidyalaya Samiti, B-15, Institutional Area,Sector-62,NOIDA-201307,District Gautam Budh Nagar,(Uttar Pradesh).
3. The Director of Education, Directorate of Education, Govt. of NCT of Delhi, Old Secretariat, Delhi-110054.

Contd....2....

**STATE GOVT PERMISSION :**

महाराष्ट्र शासन

क्रमांक:व्हीएलएस १०९६/[५७३]/प्राशि-३
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० ऑक्टोबर,१९९६

प्रति,

विभागीय शिक्षण उप.
नाशिक/पुणे/कोल्हापूर/अमरावती/
नागपूर/औरंगाबाद

विषय : सन १९९६–९७ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...

सन १९९६–९७ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी इ. १ ली ते सन १९९६–९७ या शैक्षणिक वर्षात सुरु असलेल्या वर्गासह [प्रत्येकी एका तुकडीस] [illegible] इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटींवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्यांचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल :–

२.१ सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

२.३ शाळेत,शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय/कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचा-यांसाठी विहित नोंद वह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरूपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम क्षेत्रीय अधिका-यांकडे [परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे] करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

३. शिक्षण उपसंचालकांनी संबंधित संस्थेस सक्षम अधिका-यांमार्फत यथानियम शासनाची परवानगी कळविण्यापूर्वी खालील बाबी प्रामुख्याने पडताळाव्यात :-

३.१ संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

३.२ संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३.३ सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

३.४ संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार बाबत अत्याचाराबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

३.५ संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

३.६ संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

३.७ शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

३.८ संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

३.९ संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

३.१० सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.

३.११ सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही,असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

३.१२ शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.१० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी ~~ममम~~ हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

४. वरील परिच्छेद १ ते ३ मधील पडताळणी करुन विभागीय शिक्षण उपसंचालक, यांनी सक्षम अधिकाऱ्यांमार्फत संस्थेस शासनाच्या परवानगीबाबतचा निर्णय कळवावा. जर यादीतील संस्थेने परिच्छेद दोन मधील कुठलीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ करुन शासनास तसा अहवाल तातडीने पाठवावा.

५. तरी याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच वर उल्लेखिलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

६. मंजूरी देण्यात आलेल्या या संस्थांपैकी ज्या संस्था, मंजूरीचे पत्र उशीरा प्राप्त झाल्यामुळे सन १९९६-९७ याचर्षी प्राथमिक शाळा सुरु करु शकणार नाहीत,

-४/-

त्या संस्थांना सन १९९७–९८ यावर्षांचे नुतनीकरण करण्यास शिक्षण उपसंचालकांना अधिकार देण्यात येत आहेत.

[ सु. वि. पाटील ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :–

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२] शिक्षणाधिकारी [प्राथमिक], जिल्हा परिषद,
३] प्रशासन अधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका शिक्षण मंडळ,
४] मा. शालेय शिक्षणमंत्री यांचे खाजगी सचिव
५] मा. राज्यमंत्री [शालेय शिक्षण] यांचे खाजगी सचिव

यांना माहितीसाठी अग्रेषित.

प्रत निवड नस्ती, कार्यासन प्राशि–३

सन १९९६-९७ पासून [जून,१९९६ पासून] इंग्रजी माध्यमाच्या नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्रमांक- पीएसए १०९६/[५७३]/प्राशि-३, दिनांक 30 १०.१९९६चे सहपत्र.

| अ.क्र. संस्थेचे नांव | शाळेचे नांव ठिकाण |
| --- | --- |
| **जिल्हा-कोल्हापूर** | |
| १] श्री.वारणा विभाग शिक्षणमंडळ, वारणानगर,ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. | सात्यासाहेब कोरे इंग्लिश ॲकॅडमी, वारणानगर,ता.पन्हाळा. |
| २] आर.एस.तावडे फौन्डेशन,१७३७/ई, ५ वी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर. | बडस् एंड ब्लॉसम्स-प्रायमरी स्कूल, राजारामपुरी, कोल्हापूर. |
| **जिल्हा-सातारा** | |
| १] एस.पी.नंबू चॅरीटेबल ट्रस्ट, पाचगणी. | स्वीट मेमरीज स्कूल,पाचगणी, नगर परिषद,पाचगणी. |
| २] गोदावत एज्युकेशनल फौन्डेशन, पाचगणी,ता.महाबळेश्वर,जि.सातारा | सिल्व्हर-डेल हायस्कूल[मुलींचे] पाचगणी,नगरपरिषद,पाचगणी. |
| **जिल्हा-सांगली** | |
| १] मानुनीन एज्युकेशन सोसायटी, प्लॉट नं.२३,सोना कॉलनी, जवाहर हाऊसिंग सोसायटीजवळ, सांगली. | सुपर इंग्लिश मिडीयम स्कूल, सांगली. |
| २] लोकनेते मा.हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट,विटा, ता.खानापूर,जि.सांगली. | न्यू इंग्लिश स्कूल,वीटे,ता.खानापूर जि.सांगली. |

**<u>INTIMATION TO STATE GOVT ABOUT CBSE :</u>**

# *M. P. Nandu Charitable Trust*


C/o Benzer
49, Bhulabhai Desai Road,
Bombay - 400 026.
Tel. : (022) 3632266

Sweet Memories School,
Ruighar,
Panchgani - 412 805.
Tel. : (02168) 40596


*Ref. No.* जावक क्र. 26 /SMHS/2013

Date 27/09/2013

To,
मा. शिक्षणमंत्री / शिक्षण राज्यमंत्री यांचे सचिव
शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य

विषय : विध्यमान <u>स्वीट मेमरिज हायस्कूल</u> , पाचगणी, जि. सातारा
शाळेसाठी **CBSE Affiliation** करीता **NOC** मिळणे बाबत.

अर्जदार : एम. पी. नंदू चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई स्वीट मेमरिज हायस्कूल , पाचगणी, जि. सातारा

महोदय,

आमची प्राथमिक शाळा (१ली ते ७) शासन परवानगी पत्र व्हिएलएस / **1096 / 8576** / प्रा शि / **3** दिनांक **30/10/1996** नुसार चालु आहे व माध्यमिक शाळा (८वी ते १०वी) शासन परवानगी पत्र एसएसएन / **1997 / 7780** मा शि- १ दिनांक **9/12/1997** नुसार चालु आहे आमचा एस एस सी बोर्ड नं. **21.07.022** आहे. आम्ही **CBSE** अभ्यासक्रम सलग्नतेसाठी अर्ज केलेला आहे त्यासाठी आम्हांस आपले नाहरकत प्रमाणपत्र **[NOC]** मिळावे हि नम्र विनंती. तसेच दिनांक २० जुन २०१२ च्या <u>शासन निर्णय क्र नाहप्र **2009/(663/09)** माशि–१</u> नुसार आपण सूचित केलेल्या प्रपत्राच्या स्वरुपात अर्ज करीत आहोत तरी आपणांस विनंती आहे की आम्हांस **CBSE** अभ्यासक्रम सलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्र **(NOC)** दयावे.

**PRINCIPAL**
**SWEET MEMORIES HIGH SCHOOL**
**& JR. COLLEGE, PANCHGANI-412 805.**

**For M. P. Nandu Charitable Trust**
**Mng. Trustee**